महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
कामगार औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
४ था मजला, प्लॉट जी - ९, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.
दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११

महावितरण
email : ciro@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

जा.क्र. : काऔसंवि/ब/ **२९७३७** दिनांक :३०/०९/२०११

# परिपत्रक

विषय : कंपनीच्या सेवेत असताना मृत्यु पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांना अंत्यविधीसाठी मदत देणे तसेच मयत कर्मचाऱ्याच्या कुटुंबियांचे सांत्वन करण्याबाबत.

*************

कंपनीच्या सेवेत असताना एखादा कर्मचारी मृत्यु पावल्यास त्याच्या कुटुंबियांना व नातेवाईकांना अतिदुःख झालेले असते व असे प्रसंग अचानकपणे उद्भवल्याने, त्यातही कुटुंबातील कर्ता पुरुषच मृत्यु पावला असेल तर अशा वेळी कंपनी व्यवस्थापनाने त्याच्या कुटुंबियांना व नातेवाईकांना मदत करावी, अशी इतर कर्मचारीवर्गाची भावना असते.

याबाबत सा.आ.क्र. ६० दि. १४/१०/१९७० तसेच सुधारपत्र क्र. १ दि. ०३/०४/१९९० नुसार अंत्यविधीसाठी द्यावी लागणारी मदत देण्याचे अधिकार कार्यकारी अभियंता व त्यावरील दर्जाचे अधिकारी यांना देण्यात आलेले आहेत. अशा मृत कर्मचाऱ्याच्या अवलंबितांना मृत कर्मचाऱ्याच्या एक महिन्याच्या पगारा इतकी रक्कम अंत्यविधी सहाय्य म्हणून देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

मा. व्यवस्थापकीय संचालक यांनी देखील याबाबत या कार्यालयाचे परिपत्रक क्र. ३८०९० दि.१४/१२/२००५ अन्वये सर्व कार्यालय प्रमुखांना कळवून कार्यालय प्रमुखांनी स्वतः किंवा त्यांच्या इतर सहकारी अधिकाऱ्यास घटना स्थळी पाठवून दुःखद कुटुंबियांचे सात्वंन करावे व त्यांना देय असणारी आर्थिक मदत ताबडतोब द्यावी व ही बाब अत्यंत महत्वाची समजून त्याचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे असे निर्देश दिलेले आहेत.

वरीलप्रमाणे निर्देश देऊन सुद्धा अलिकडील काही घडलेल्या घटनांवरुन असे दिसून आले आहे की, याबाबतीत काटेकोरपणे पालन होत नाही. यास्तव परिमंडळातील उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांनी याबाबतीत जबाबदारी घेऊन असे दुःखद प्रसंग घडल्यास स्वतः जाऊन किंवा संबंधित कार्यालयाच्या अधिकाऱ्यांमार्फत अंत्यविधी सहाय्य रक्कम रोखीने दिली जाईल, तसेच संबंधित कार्यालयातील अधिकारी घटना स्थळी जाऊन दुःखद कुटुंबियांचे सात्वंन करतील याबाबत खातरजमा करावी व वरिष्ठ अधिकाऱ्यांना तशी माहिती द्यावी. यासंदर्भात कार्यवाही करताना काही अधिकारी / कर्मचारी टाळटाळ करताना आढळल्यास तसा अहवाल वरिष्ठ कार्यालयास द्यावा, जेणेकरुन अशा अधिकारी / कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत विचार करण्यात येईल.

वरील निर्देशाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

सदर परिपत्रक कंपनीच्या www.mahadiscom.in संकेतस्थळावर प्रसारित करण्यात आले आहे.

राहुल गोवर्धन

(कर्नल राहुल गोवर्धन)
कार्यकारी संचालक (मा.सं.)

प्रति : कार्यकारी अभियंता व तत्सम पातळीपर्यंत

E:\Backup Of Meena\D Drive\kam B on\santvan mrutyu1.doc